महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

==================================================================

जावक क्रमांक – ४०२१/५६ दिनांक :- १० ऑक्टोबर, २०२४

**प्रसिद्धिपत्रक**

# म्हाडा पुणे मंडळातर्फे ६२९४ सदनिकांच्या विक्रीसाठी अर्ज नोंदणी व भरणा प्रक्रियेला प्रारंभ

- पुणे मंडळाचे सभापती श्री. शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या हस्ते सोडतीचा 'गो-लाइव्ह' समारंभ
- ५ डिसेंबर रोजी पात्र अर्जांची सोडत

मुंबई, दि. १० ऑक्टोबर, २०२४ : पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे (म्हाडाचा घटक) पुणे, पिंपरी-चिंचवड व पीएमआरडीएसह सोलापूर, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील विविध गृहनिर्माण योजनेतील ६ हजार २९४ सदनिकांच्या विक्रीकरिता आयोजित संगणकीय सोडतीसाठी अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेचा शुभारंभ पुणे मंडळाचे सभापती श्री. शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या हस्ते 'गो - लाईव्ह' कार्यक्रमांतर्गत करण्यात आला.

म्हाडा पुणे मंडळाच्या कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाला पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. राहुल साकोरे, कार्यकारी अभियंता श्री. प्रकाश वाबळे, श्रीमती मनीषा मोरे, उपमुख्य अधिकारी श्री. मोहन बोबडे आदी उपस्थित होते.

श्री. पाटील म्हणाले की, सर्वसामान्यांना परवडणारी घरे मिळण्यासाठी म्हाडा एकमेव, विश्वासार्ह पर्याय आहे. म्हाडाच्या अद्ययावत संगणकीय प्रणालीमुळे कुठल्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय अर्ज सादर करणे ते सदनिकेचा ताबा मिळण्याची प्रक्रिया ऑनलाइन झाली आहे. भविष्यात म्हाडाच्या माध्यमातून परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असून आळंदी, शिरूर येथे जागा उपलब्ध झाली असून लवकरच येथे गृहनिर्माण योजना राबविली जाणार आहे. पुण्यातील म्हाडाच्या जुन्या वसाहतींच्या पुनर्विकास योजनेच्या माध्यमातूनही परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे श्री. पाटील यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी ज्येष्ठ उद्योगपती, पद्मविभूषण रतन टाटा यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. पुणे मंडळातर्फे सदनिका विक्रीसाठी ऑनलाईन संगणकीय सोडत ५ डिसेंबर, २०२४ रोजी काढण्यात येणार आहे. दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ रोजी दुपारी १२.०० वाजेपासून ऑनलाइन अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रियेस सुरुवात होणार असून नोंदणीकृत अर्जदार दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ रोजी १२.०० वाजेपासूनच ऑनलाइन अनामत रक्कम भरू शकणार आहेत. तसेच ऑनलाइन अर्ज नोंदणी व अर्ज भरणा प्रक्रिया दिनांक १२ नोव्हेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता संपुष्टात येणार आहे. दिनांक १२ नोव्हेंबर, २०२४ रोजी रात्री ११.५९ पर्यन्त अर्जदार ऑनलाइन अनामत रक्कमेचा भरणा करू शकणार आहेत. दिनांक १३ नोव्हेंबर, २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत RTGS / NEFT द्वारे अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येईल. सोडतीसाठी स्वीकृत अर्जांच्या प्रारूप यादीची प्रसिद्धी दिनांक २३ नोव्हेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ७.०० वाजता म्हाडाच्या https://housing.mhada.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानंतर दिनांक २७

नोव्हेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अर्जदारांना प्रारूप यादीवर आपल्या हरकती नोंदविता येणार आहेत. ३० नोव्हेंबर, २०२४ रोजी सोडतीत सहभाग घेणार्या अर्जांची यादी म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार आहे.

पुणे मंडळातर्फे जाहीर करण्यात आलेली सोडत पाच घटकांमध्ये विभागण्यात आली असून यामध्ये म्हाडा गृहनिर्माण योजनेतील प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या योजनेअंतर्गत २३४० सदनिका विक्रीसाठी सोडतीत उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच म्हाडा गृहनिर्माण योजनेअंतर्गत ९३ सदनिका, प्रधानमंत्री आवास योजनेतील ४१८ सदनिका प्रथम येणार्या स प्रथम प्राधान्य तत्वावर नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच २० टक्के सर्वसमावेशक गृहनिर्माण योजनेअंतर्गत पुणे महानगरपालिका, चिंचवड महानगरपालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील एकूण ३३१२ सदनिकांचा समावेश आहे तसेच १५ टक्के सामाजिक गृहनिर्माण योजनेतील १३१ सदनिकांचा समावेश आहे.

मंडळातर्फे इच्छुक अर्जदारांना आवाहन करण्यात येत आहे की, अर्ज नोंदणी व अर्ज भरणा करण्याआधी या माहिती पुस्तिकेचे अवलोकन करावे. ही पुस्तिका https://housing.mhada.gov.in या म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर इच्छूक अर्जदारांकरिता उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच सदनिकांच्या वितरणासाठी म्हाडाने कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदाराने कोणत्याही अशा व्यक्तीशी परस्पर व्यवहार करू नये तसे केल्यास पुणे मंडळ कोणत्याही व्यवहारास / फसवणूकीस जबाबदार राहणार नाही.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

**सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

**Maharashtra Housing & Area Development Authority**

Public Relations Department

Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East, Mumbai-400051. Email : cpromhadaoffice@gmail.com

==========================================================================

Outward No. : 4021/56 Dt. 10th October, 2024

Press Release

# MHADA Pune Board Announces Online Lottery for the Sale of 6,294 Housing Units

- **Go-Live Ceremony to be Inaugurated by Pune Board Chairman, Shri Shivajirao Adhalrao Patil**
- **Lottery for Eligible Applicants on December 5**

Mumbai, October 10, 2024: The Pune Housing and Area Development Board (a division of MHADA) has announced an online lottery for the sale of 6,294 housing units across Pune, Pimpri-Chinchwad, PMRDA regions, and also in Solapur, Kolhapur, and Sangli districts under various housing schemes. The registration and application process will officially begin on Thursday, October 10, 2024, at 12:00 PM. The 'Go-Live' event will be inaugurated by Shri. Shivajirao Adhalrao Patil, Chairman of the Pune Board.

The online lottery for the sale of these housing units will be conducted on December 5, 2024.

Beginning at 12:00 PM on October 10, 2024, interested applicants can start the online registration and application process. On the same day, they will also be able to make payments online. The registration and application process will close on November 12, 2024, at 5:00 PM. Additionally, applicants will have until 11:59 PM on November 12, 2024, to submit their Earnest Money Deposit (EMD). Payments via RTGS/NEFT can be made until 3:00 PM on November 13, 2024, during regular banking hours.

The provisional list of accepted applications will be published on November 23, 2024, at 7:00 PM on MHADA's official website, https://housing.mhada.gov.in. Applicants will be allowed to raise objections to the provisional list until 5:00 PM on November 27, 2024. The final list of eligible participants for the lottery will be published on November 30, 2024.

The lottery announced by the Pune Board has been divided into five categories. Under the First-Come, First-Served (FCFS) Scheme, 2,340 housing units will be available for sale. Additionally, 93 units will be offered under the MHADA Housing Scheme, and 418 units under the Pradhan Mantri Awas Yojana (PMAY) will be made available to the public on a first-come, first-served basis. Furthermore, 3,312 housing units under the 20% Comprehensive Housing Scheme will be available in the Pune Municipal Corporation, Pimpri-Chinchwad Municipal Corporation, and Pune Metropolitan Region Development Authority (PMRDA) areas. Lastly, 131 units will be available under the 15% Social Housing Scheme.

The Pune Board advises interested applicants to carefully review the information booklet before registering and applying. This booklet is available on MHADA's official website at https://housing.mhada.gov.in. Additionally, MHADA has not appointed any agents, consultants, or property agents for this lottery. Applicants are strongly urged not to engage with such individuals, as the Pune Board will not be responsible for any fraudulent dealings or unauthorized transactions.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA